**महाराष्ट्र शासन वन विभाग**

**मुख्य वनसंरक्षक, चंद्रपुर वनवृत्त चंद्रपुर, यांचे कार्यालय**

**वनभवन,सिव्हील लाईन, नागपुर रोड, चंद्रपूर**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दुरध्वनी क्र.07172-256279, 252232 E-mail :- ccfchandrapur@gmail.com, ccfchandrapur@mahaforest.gov.in


क्रमांक : कक्ष-3(1)/जमिन/प्र.क्र.48/2024-25/ 28 दिनांक :- 10-08-24

प्रति,

**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वन्यजीव) पुर्व**
**नागपूर**

विषय :- दुर्गापूर ओपन कास्ट माईन प्रकल्पासाठी आवश्यक चंद्रपूर जिल्हयातील 80.77 हे. वनजमीनी वरील खाणपटटा नुतनीकरणाच्या प्रस्तावास राष्ट्रीय वन्यजीव मंडळाच्या मान्यतेकरीता सादर.

संदर्भ :- 1. महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र. एफएलडी-2019/प्र.क्र.310/फ-10, दिनांक 01.01.2021
2. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), म.रा. नागपूर यांचे कार्या पत्र क्र. कक्ष-23(2)/वजी/सर्व्हे/प्र.क्र.292/5236, दिनांक 14.02.2024
3. विभागीय वन अधिकारी, चंद्रपूर वनविभाग, चंद्रपूर यांचे कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-14/सर्व्हे/जमीन/2358, दिनांक 27.03.2024

महाराष्ट्र शासनाचे संदर्भिय पत्र क्र. 1 अन्वये दुर्गापूर ओपन कास्ट माईन 80.77 हे. नुतनीकरण प्रस्तावाच्या अनुषंगाने 2 मुदयांची माहिती बाबत विचारणा करण्यात आलेली होती. त्यानुषंगाने प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), म.रा. नागपूर यांचे कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्र. 2 अन्वये दुर्गापूर ओपन कास्ट प्रकल्पाचे 80.77 हे. क्षेत्र व्याघ्र भ्रमणमार्गात येत असल्यामुळे प्रकल्प यंत्रणेनी वन्यजीव मान्यतेचा प्रस्ताव देण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

त्यानुषंगाने प्रकल्प यंत्रणेनी वन्यजीव मान्यतेचा प्रस्ताव विभागीय वन अधिकारी, चंद्रपूर वनविभाग, चंद्रपूर यांचेकडे सादर केला असता त्यांनी प्रस्तावाची तपासणी करून Part-III, Site Inspection Report व इतर माहिती भरून हार्ड कॉपीसह संदर्भिय पत्र क्र. 3 अन्वये या कार्यालयास सादर केलेली आहे.

वन्यजीव मान्यतेच्या प्रस्तावामध्ये निम्न हस्ताक्षरकर्ते यांनी Part-IV मध्ये अभिप्राय दिलेला असून प्रस्तावाच्या 4 प्रती पत्रासोबत सादर करण्यात येत आहे.

करीता माहितीस सविनय सादर.

**सहपत्र :-** वरीलप्रमाणे 4 प्रती

(डॉ. जितेंद्र रामगावकर)
**मुख्य वनसंरक्षक**
**चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर**

**प्रतिलिपी-** अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म. रा. नागपूर यांना माहिती व आवश्यक सविनय सादर. विषयांकीत प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाचे संदर्भिय पत्र क्र. 1 अन्वये उपस्थित केलेल्या मुदयांची पुर्तता प्रकल्प यंत्रणेनी केलेली आहे. करीता वन्यजीव मान्यतेच्या प्रस्तावाची 1 प्रत पत्रासोबत सादर करण्यात येत आहे.

**प्रतिलिपी-** विभागीय वन अधिकारी, चंद्रपूर वनविभाग, चंद्रपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.

**प्रतिलिपी-** क्षेत्रिय महाप्रबंधक, वे.को.लि., चंद्रपूर क्षेत्र, बाबुपेठ, चंद्रपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.



स्वा/-
मुख्य वनसंरक्षक
चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर